**नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत विविध विकास बांधकामे / विकास योजना यांच्याशी संबंधीत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आणि निविदा / कंत्राट स्विकारण्याच्या अधिकार प्रदान करण्याबाबत**

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

**( लेखा व वित्त विभाग )**

**आदेश क्र. ८२९ /प्रलेविअ/विअ/२०२०, दिनांक ३ जून २०२०**

प्रशासन 1415/RO 24/7/20

**आदेश-**

नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत विविध विकास बांधकामे/ विकास योजना यांच्याशी संबंधीत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आणि निविदा/कंत्राट स्विकारण्याच्या विविध अधिकाऱ्यांना असलेल्या अधिकारांचा सखोल विचार करून पुढील प्रमाणे शक्तींची प्रक्रांती (Delegation of Powers) परिशिष्ट 'अ' प्रमाणे प्रदान करण्यात येत आहे.

१. प्रदत्त शक्तींचा वापर करुन दिल्या जाणाऱ्या मंजूरीबाबतचा प्रत्येक आदेश सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करावा. या अधिकाराचा वापर करुन मंजूरी आदेश निर्गमित करतांना सदर मंजूरी आदेशाची प्रत इतर सर्व संबंधित अधिकाऱ्याप्रमाणेच संबंधित लेखापरीक्षा अधिकारी व वित्त विभाग ( मुख्य लेखा व वित्त अधिकारी ) पाठवावी व अशा मंजूरी आदेशामध्ये नियमपुस्तिकामध्ये संबंधित शक्तींचा अनुक्रमांक व शिर्षक याचा स्पष्ट उल्लेख करावा. सर्व प्रदान करण्यात आलेल्या शक्तींना वापर करतांना त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने संबंधित शक्तींच्या समोर विहित करण्यात आलेल्या वित्तीय मर्यादेचे सक्षम अधिकाऱ्याकडून उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

DyMC GAD
महत्वाचे.
AC GAD

२. ज्याबाबतीत वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आलेल्या नाहीत तसेच प्रदान काही अटींच्या अधीन केले असतील व त्या अटी किंवा त्यातील एखादी अट पूर्ण होत नसेल तर त्याबाबतीत प्रशासकीय किंवा वित्तीय मंजूरी आयुक्तांच्या पूर्व संमतीशिवाय देता येणार नाही.

CAFO

३. या अधिकारांचा वापर करुन मंजूरी प्रदान करतांना ज्या प्रकरणी विशिष्ट मानके (Standards) विहित केलेली असतील अशा प्रकरणी विहित मानकाचे अनुसरण करण्यात यावे. तसेच कोणत्याही बाबी करीता आयुक्तांची" विशेष बाब " म्हणून मंजूरी घेण्यात आली असेल अशा बाबींच्या संदर्भात दुरुस्ती सेवा संविदा करार किंवा अन्य प्रश्न उदभवल्यास वित्त विभागाचा सल्ला घेण्यात यावा.

४. यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक अधिकार प्रदानाचे आदेश निष्प्रभावित करुन सदरचा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

( मुळ प्रत मा. आयुक्त यांचे मान्यतेने )

( हेमंत ठाकरे )
प्रमुख लेखा व वित्त अधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलीपी माहितीस्तव**

१ मा. महापौर यांचे स्वियं सहाय्यक, नागपूर महानगरपालिका, नागपूर

२ मा. उपमहापौर यांचे स्विय सहाय्यक, नागपूर महानगरपालिका, नागपूर

३ मा. अध्यक्ष स्थायी समिती यांचे स्विय सहाय्यक, नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रत: कार्यवाहीस्तव**

४ मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर

५ अपर आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर

६ मुख्य अभियंता, नागपूर महानगरपालिका, नागपूर

७ अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर महानगरपालिका नागपूर

८ अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर

९ सर्व कार्यकारी अभियंता, नागपूर महानगरपालिका, नागपूर

१० मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर

११ सर्व उपायुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर

१२ सर्व सहाय्यक आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर

१३ लेखा अधिकारी/ महानगरपालिका लेखा परीक्षक, नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रमुख लेखा व वित्त अधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

## परिशिष्ट “अ”

## नागपूर महानगरपालिकेमधील विविध योजना राबविण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देण्याबाबतचा आणि कंत्राटे स्विकारण्याच्या अनावर्ती खर्चाच्या अधिकारा संदर्भात शक्तींची प्रक्रांती

(Delegation Of Powers)

| अ.क्र. | अधिकाराचे स्वरूप | अधिकार प्रदान करण्यात आलेले प्राधिकारी/प्राधिकरण (Authority) | अंदाजित अनावर्ती खर्च (रूपयात) | |
|---|---|---|---|---|
| | | | न्यूनतम मर्यादा | अधिकतम मर्यादा |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भाग-१ | **मूळ आणि सुधारित अंदाजांना प्रशासकीय मंजुरी देण्याचा अधिकार** | | | |
| | १ :- प्रशासकीय मंजुरी देण्याचा अधिकार हा ज्यांचेकडे प्रदान करण्यात आलेला आहे ते प्राधिकारी असे समजण्यात यावे.<br>२ :- प्रशासकीय मान्यता देतांना कामाची ब्दीरूक्ती झाली असल्याचे आढळल्यास प्रथम जबाबदारी निश्चीत करावी व तदनंतर मनपा निधी व्यतीरीक्त इतर निधीमधून देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता ग्राह्य धरण्यात यावी.<br>३ :- सुधारीत प्रशासकीय मान्यतेकरीता मुळ कामाच्या १०% टक्के वा रू. ५०,०००/- (रूपये पन्नास हजार फक्त) पर्यंत यापैकी जे कमी चे अधिकार (कमाल मर्यादा रू. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) रकाना क्र. ३ मध्ये नमुद अधिकाऱ्यांना राहील व त्यापेक्षा जास्त रकमेकरीता रू. २५.०० लक्षापेक्षा (रूपये पंचविस लक्ष फक्त) जास्त कामाकरीता मनपा सभागृहाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.<br>४ :- कोणत्याही कामाची | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रशासकीय मान्यता घेण्यापूर्वी त्या रकमेस तांत्रिक मान्यता देणाऱ्या सक्षम प्राधीकाऱ्याची तांत्रिक सहमती/तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक राहील.<br>५ :- अंदाजपत्रकातील ठोक तरतुदीचे पदाअंतर्गत प्रस्तावित कामास विभाग प्रमुखामार्फत तरतुदीची नोंद घेवुन तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करावी. | | | |
| | **उपरोक्त अधिकार खालील अटी / शर्तीस अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे**.<br>१) कामे हाती घेण्यापूर्वी कामाची आवश्यकता, तांत्रिक व्यवहार्यता व निधी उपलब्धता याबाबत विभागाने आपल्या स्तरावर खात्री करुन घ्यावी.<br>२) संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य त्या शिर्षातून कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची दक्षता घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत कामे दुबार न होण्याची संबंधीत अधिकाऱ्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.<br>३) अधिनियमातील तरतूदी, शासन आदेश व कार्यपध्दती याचे अनुपालन करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील.<br>४) यंत्रसामग्रीच्या पुस्तकी किंमतीच्या २५ टक्के पेक्षा दुरुस्तीचा वार्षिक खर्च अधिक होता कामा नये.<br>५) वस्तु खरेदी करतांना शासन आदेशानुसार GeM पोर्टल वरुन खरेदी करणे बंधनकारक आहे.<br>६) काटकसरीने खर्च करणे बाबत नियमानुरुप आवश्यक काळजी घ्यावी.<br>७) वित्तीय औचित्याचे पालन करणे | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बंधनकारक आहे.<br>८) वित्तीय नियमावलीचे तंतोतंत पालन करणेत यावे. | | | |
| | रस्ते आणि इमारती, विद्युत संच मांडणी, पाणी पुरवठा, पावसाळी नाले/नाली, क्रिडांगण निर्माण, उद्यान विकास, गटारे (सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी) इ. करावयाची कामे. | | | |
| | (१) **मूळ कामे ( भांडवली )** | | | |
| | मनपा सभागृहापुढे प्रस्ताव सादर करतांना संबंधीत विभाग प्रमुख यांनी वित्तीय तरतुदीची प्रलेविअ यांचेकडून खात्री करून घेणे आवश्यक राहील. मंजूरी नंतर प्रशासकीय मान्यता आदेश काढणे बंधनकारक राहील. | म.न.पा.सर्वसाधारण सभा | रु. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) चे वरील कामाचे पूर्ण अधिकार | |
| | अपर आयुक्त यांचेकडे विभाग विहित केलेला नसेल अशा स्थितीत रु. २५ लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) रकमेपर्यंतचे संपूर्ण वित्तीय व प्रशासकीय मंजुरीचे अधिकार आयुक्त यांचे राहतील. | आयुक्त | | रु. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) पर्यंत |
| | | संबंधित अपर आयुक्त | | रु. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) पर्यंत |
| | | संबंधित विभाग प्रमुख | | रू. ५.०० लक्ष (रूपये पाच लक्ष फक्त) पर्यंत |
| | १ :- नगरसेवक स्वेच्छा निधी अंतर्गत ची कामे प्रभाग समिती व्दारा मंजूर झालेल्या कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश सहा. आयुक्त यांनी काढावेत आणि आदेशाची प्रत नकाशासह विभाग प्रमुखाला पाठविणे व विभाग प्रमखाने त्याची नोंद घेणे बंधनकारक राहील.<br>२:- भांडवली पदा अंतर्गत काम पुर्ण | सहा.आयुक्त (प्रभाग समिती च्या मान्यतेनंतर) | | रू. २.०० लक्ष पर्यंत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | झाल्यानंतर विभाग प्रमुखाने सदर कामाची नोंद मालमत्ता विभागाकडे करणे बंधनकारक आहे. | | | |
| | (२) **महसुली कामे** | | | |
| | १ :- रकाना (३) मध्ये नमुद केलेल्या अधिकाऱ्यांना बांधकामांस निश्चितपणे धोकादायक / आपातकालीन परिस्थती नुसार वित्तीय मर्यादा उपलब्ध नसल्यास, खात्याच्या ताब्यातील अशा सर्व बांधकामांची निकडीने दुरूस्ती करण्यास, कोणत्याही आवश्यक व वाजवी रकमेच्या खर्चास दिलेल्या वित्तीय मर्यादेत आयुक्त यांचे मान्यतेनंतर मंजुरी देता येईल. | | | |
| | २ :- नविन कामाची प्रशासकीय मान्यता देतांना उपलब्ध तरतुदीच्या १.२५ पट रकमेतुन प्रथम दायीत्व वजा करावे व नंतर उर्वरीत राशीच्या मर्यादेत नवीन कामांची रक्कम सिमीत राहील याची खात्री विभाग प्रमुखाने करावी.<br>३ :- विवीक्षीत कामांकरीता (जे प्रकल्प दिर्घ काळाकरीता प्रस्तावित केले आहे) १.२५ पटीची अट लागु राहणार नाही. मात्र यासाठी विभाग प्रमुखांनी आयुक्त यांची मान्यता प्राप्त करावी. | म.न.पा.सर्वसाधारण सभा | रु. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त)चे वरील कामाचे पूर्ण अधिकार | |
| | | आयुक्त | | रु. २५.०० लक्ष पर्यंत |
| | | संबंधित अपर आयुक्त | | रु. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) पर्यंत |
| | | उप आयुक्त/विभाग प्रमुख | | रु. ५.०० लक्ष (रूपये पाच लक्ष फक्त) पर्यंत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १ :- महसुली कामाकरिता ठोक तरतूदी मधून प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार रकाना क्र. ४/५ प्रमाणे नमुद आहेत. कार्यकारी अभियंता पदातंर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांची अंमलबजावणी करतील. कार्यकारी अभियंता स्तरावरील मंजूर झालेल्या कामांचे प्रशासकीय मान्यता आदेश व नकाशासह प्रत विभाग प्रमुखाला पाठविणे व विभाग प्रमुखाने त्याची नोंद घेणे बंधनकारक राहील. | कार्यकारी अभियंता | | रू. ३.०० लक्ष (रूपये तिन लक्ष फक्त) पर्यंत |
| | **(३) विशेष प्रकारची अवजारे व संयत्र/ वाहन दुरुस्ती** | | | |
| | | म.न.पा.सर्वसाधारण सभा | रु. २५.०० लक्षा (रूपये पंचवीस लक्ष फक्त) चे वर पुर्ण अधिकार | |
| | | आयुक्त | | रु. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) पर्यंत |
| | | विभाग प्रमुख | | रु. ५.०० लक्ष (रूपये पाच लक्ष फक्त) पर्यंत |
| | टीप : म.न.पा.च्या विविध विभागाची सयंत्रे व वाहन दुरुस्ती संबंधित विभागाच्या उपलब्ध तरतूदीच्या अधिन राहून देण्यात येईल याबाबतची दक्षता कार्यकारी अभियंता (प्रकल्प) यांनी घ्यावी. | कार्यकारी अभियंता (प्रकल्प) | | प्रत्येक प्रकरणी रू. ३.०० लक्ष (रूपये तिन लक्ष फक्त) (वार्षिक मर्यादा रु. १०० लक्ष) |
| | टीप : म.न.पा.च्या विविध विभागाची सयंत्रे व वाहन दुरुस्ती संबंधित विभागाच्या उपलब्ध तरतूदीच्या अधिन राहून देण्यात येईल याबाबतची दक्षता उप अभियंता (यांत्रिकी) यांनी घ्यावी. | उप अभियंता (यांत्रिकी) | | प्रत्येक प्रकरणी रू. १.०० लक्ष (रूपये एक लक्ष फक्त) (वार्षिक मर्यादा रु. ५० लक्ष) |

| भाग - २ | मूळ बांधकामे व दुरूस्ती आणि सुधारित अंदाजांना तांत्रिक मंजुरी देण्याचा अधिकार | | |
|---|---|---|---|
| | १ :- अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांना निर्धारित केलेल्या शर्तीच्या अधीनतेने एखाद्या प्रशासकिय मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या घटक भागांसाठीच्या तपशीलवार अंदाजांनाही रकाना ४/५ मध्ये त्या त्या बाबींसमोर नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत मुख्य अभियंता यांच्या मान्यतेनंतर तांत्रिक मंजुरी देता येईल. असे घटक भाग हे, योजनेतील एक स्वतंत्र्य एकक असले पाहिजेत.<br>२ :- वरील क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुख्य अभियंता यांना आवश्यकता वाटल्यास आयुक्त यांना संदर्भ व्दारे सादर करुन निर्देश प्राप्त करुन घेतील.<br>३ :- शक्यतोवर सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे टाळावे. आवश्यकतेनुसार मुळ तांत्रिक मान्यतेच्या १०% टक्के वा रू. ५०,०००/- (रूपये पन्नास हजार फक्त) यापेक्षा कमी असेल त्याचे अधिकार मा. मुख्य अभियंता यांना राहतील. त्यापेक्षा जास्त रकमेकरीता संदर्भ व्दारे मा. मुख्य अभियंता यांनी आयुक्त यांची मान्यता घेवून त्यानंतर सुधारीत तांत्रिक मान्यता प्रदान करावी.<br>४:- मंजुर निविदा रकमेच्या मर्यादेत Quantity Variation (परीमाणानातील बदलास) मान्यता देण्याचे अधिकार रकाना क्र. ३ मधील अधिकाऱ्यांस रकाना क्र. ४/५ मध्ये नमुद राशी पर्यंत राहील. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रस्ते आणि इमारती, विद्युत संच मांडणी, पाणी पुरवठा, पावसाळी नाले/नाली, क्रिडांगण निर्माण, उद्यान विकास, गटारे (सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी) इ. करावयाची कामे. | | | |
| | (१) **मूळ कामे** ( **भांडवली** ) | | | |
| | | मुख्य अभियंता | पूर्ण अधिकार | |
| | | अधीक्षक अभियंता | | रू. २५.०० लाख (रूपये पंचवीस लक्ष फक्त) पर्यंत |
| | | कार्यकारी अभियंता | | रू. १०.०० लाख (रूपये दहा लक्ष फक्त) पर्यंत |
| | | उप अभियंता | | रू. ५.०० लाख (रूपये पाच लक्ष फक्त) पर्यंत |
| | १) फलोद्यानविषयक कामांबाबत - पूर्ण अधिकार २) अभियांत्रिकी कामांसाठी अ.क्र. १ प्रमाणे तांत्रिक मान्यतेच्या मर्यादेनुसार संबंधित अभियंत्याने तात्रिक दृष्टीकोनातून नकाशे व अंदाज यांची छाननी केली असली पाहिजे आणि त्याचे द्योतक म्हणून त्याने नकाशांवर सही केली असली पाहिजे. ३) उपायुक्त (उद्यान) यांनी प्रकल्पाशी निगडीत फलोद्यानाविषयक कामे लक्षात घेऊन प्रस्ताव अचूक असल्याबद्दल स्वतःची खात्री करून घेतली असली पाहिजे. | उपायुक्त (उद्यान) | फलोद्यानविषयक कामांबाबत - पूर्ण अधिकार | |
| | | उद्यान अधिक्षक | | फलोद्यानविषयक कामांसाठी प्रत्येक प्रकरणी रू. ५.०० लक्ष (रूपये पाच लक्ष फक्त) पर्यंत |
| | **विद्युत संच मांडणीसाठी** - | | | |
| | रु. १०.०० कोटी (रूपये दहा कोटी फक्त) पेक्षा जास्त रकमेच्या | मुख्य अभियंता | | रू. १०.०० कोटी (रूपये |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कामांकरिता आयुक्त यांचे अनुमतीने मुख्य अभियंता यांचे अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समिती गठीत करावी त्यामध्ये (१) महानगरपालिके चे संबंधीत अधिक्षक अभियंता (२) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लिमी. चे अधीक्षक अभियंता / शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता (विदद्युत) व (३) सदस्य सचिव म्हणून कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा समावेश राहील. समितीव्दारा घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मुख्य अभियंता तांत्रिक मान्यता प्रदान करतील. | | | दहा कोटी फक्त) पेक्षा जास्त रकाना क्र. २ प्रमाणे |
| | रू. ५०.०० लक्षाचे वर (रूपये पन्नास लक्ष फक्त) व रू. १०.०० कोटी पर्यंत (रूपये दहा कोटी फक्त) रकमेच्या कामांकरिता मुख्य अभियंता यांचे अनुमतीने अधिक्षक अभियंता यांचे अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समिती गठीत करावी त्यामध्ये (१) शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता (विद्युत) (२) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लिमी. चे कार्यकारी अभियंता व (३) सदस्य सचिव म्हणून कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा समावेश राहील. समितीव्दारा घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे कामाचे स्वरूपानुसार संबंधीत अधिक्षक अभियंता (सा.बां.वि./ सा.आ.अ.वि.) तांत्रिक मान्यता प्रदान करतील. | अधिक्षक अभियंता | | रू. ५०.०० लक्षाचे वर (रूपये पन्नास लक्ष फक्त) व रू. १०.०० कोटी पर्यंत (रूपये दहा कोटी फक्त) रकाना क्र. २ प्रमाणे |
| | | कार्यकारी अभियंता | | रू. ५०.०० लक्ष (रूपये पन्नास लक्ष फक्त) पर्यंत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | उप अभियंता | | रु. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) पर्यंत |
| | **(२) महसुली कामे** | | | |
| | १ :- अधीक्षक अभियंता रू. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) पेक्षा जास्त रकमेच्या कामाकरीता संदर्भ व्दारे मुख्य अभियंता यांची मान्यता घेवून तांत्रिक मान्यता प्रदान करू शकतील. | अधीक्षक अभियंता | रु. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) | रु. १०.०० लक्षा पेक्षा जास्त रकाना क्र. २ प्रमाणे |
| | | कार्यकारी अभियंता | | रु. ५.०० लक्ष (रूपये पाच लक्ष फक्त) पर्यंत |
| | | उप अभियंता | | रू. १.०० लक्ष (रूपये एक लक्ष फक्त) पर्यंत |
| | **विद्युत संच मांडणीसाठी** - | | | |
| | रु. ५.०० कोटी (रूपये पाच कोटी फक्त) पेक्षा जास्त रकमेच्या कामांकरिता आयुक्त यांचे अनुमतीने मुख्य अभियंता यांचे अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समिती गठीत करावी त्यामध्ये (१) महानगरपालिके चे संबंधीत अधिक्षक अभियंता (२) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लिमी. चे अधीक्षक अभियंता / शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता (विदद्युत) व (३) सदस्य सचिव म्हणून कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा समावेश राहील. समितीव्दारा घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मुख्य अभियंता तांत्रिक मान्यता प्रदान करतील. | मुख्य अभियंता | | रू. ५.०० कोटी (रूपये पाच कोटी फक्त) पेक्षा जास्त रकमेकरीता रकाना क्र. २ प्रमाणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रू. २५.०० लक्षाचे वर (रूपये पंचवीस लक्ष फक्त) व रू. ५.०० कोटी पर्यंत (रूपये पाच कोटी फक्त) रकमेच्या कामांकरिता मुख्य अभियंता यांचे अनुमतीने अधिक्षक अभियंता यांचे अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समिती गठीत करावी त्यामध्ये (१) शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता (विद्युत) (२) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लिमी. चे कार्यकारी अभियंता व (३) सदस्य सचिव म्हणून कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा समावेश राहील. समितीव्दारा घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे कामाचे स्वरूपानुसार संबंधीत अधिक्षक अभियंता (सा.बां.वि./ सा.आ.अ.वि.) तांत्रिक मान्यता प्रदान करतील. | अधिक्षक अभियंता | | रू. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) पेक्षा जास्त व रू. ५.०० कोटी (रूपये पाच कोटी फक्त) पर्यंत रकमेकरीता रकाना क्र. २ प्रमाणे. |
| | | कार्यकारी अभियंता | | रू. २५.०० लक्ष (रू. पंचवीस लक्ष फक्त) पर्यंत |
| | | उप अभियंता | | रु. ५.०० लक्ष (रूपये पाच लक्ष फक्त) पर्यंत |
| | **(३) विशेष प्रकारची अवजारे व संयत्र/ वाहन दुरुस्ती** | | | |
| | रु. २५.०० लक्षा (रूपये पंचवीस लक्ष फक्त) पेक्षा जास्त रकमेच्या कामाकरिता शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा अतिरीक्त मुख्य अभियंता (यांत्रिकी) विभाग यांचे सहमतीने तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. | विभाग प्रमुख | रू. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) पर्यंत | रू. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) पेक्षा जास्त रकमेकरीता रकाना क्र. २ प्रमाणे |
| | | उप अभियंता (यांत्रिकी) | | रू. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) पर्यंत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाग - ३ | **निविदा प्रकिया व मुदतवाढी बाबत** | | | |
| | **१) निविदा प्रपत्र मंजूर करणे** | | | |
| | | मुख्य अभियंता | रू. ५०.०० लक्ष (रूपये पन्नास लक्ष फक्त) चे वर पुर्ण अधिकार | |
| | | अधिक्षक अभियंता | रू. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) | रू ५०.०० लक्ष (रूपये पन्नास लक्ष फक्त) पर्यंत |
| | रू. ५०.०० लक्ष (रूपये पन्नास लक्ष फक्त) पेक्षा जास्त कामाकरीता निविदापूर्व बैठक घेणे बंधनकारक आहे तसेच CSD व शुध्दीपत्रक निविदा प्रपत्र मंजुर करणाऱ्या अधिकाऱ्यांची मान्यता घेवून प्रसिध्द करणे कार्यकारी अभियंता यांना बंधनकारक राहील. | कार्यकारी अभियंता | | रू. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) पर्यंत |
| | **२) निविदा सुचना प्रसिध्द करणे** | | | |
| | १:- निविदा प्रसिध्द करण्यापूर्वी अनु.क्र. १ मध्ये नमुद निविदा प्रपत्रास मंजूरी आवश्यक राहील.<br>२ :- निविदा सुचना प्रसिध्द करतांना निविदा प्रपत्रासोबतBills of Quantity सह कामाचे प्राकलन व कार्यस्थळाचे नकाशे केवळ माहितीसाठी जोडले असल्याचे नमुद करून संलग्न करणे बंधनकारक राहील. | कार्यकारी अभियंता | पुर्ण अधिकार | |
| | **३) निविदा मंजूरीचे अधिकार** | | | |
| | १:- निविदेमधील नमुद राशीपेक्षा प्राप्त निविदा १५% टक्के कमी किंवा निविदा राशी ऐवढी प्राप्त झाल्यास रकाना क्र. ४/५ मध्ये नमुद मर्यादेनुसार निविदा स्विकारण्यात यावी. जर प्राप्त निविदा १५% टक्के पेक्षा कमी असल्यास मुख्य अभियंता यांचे निदर्शनास आणुन निविदा स्विकारण्याबाबत पुर्वानुमती घेणे बंधनकारक राहील. | स्थायी समिती | रू. २५.०० लक्षा (रूपये पंचवीस लक्ष फक्त) चे वर पूर्ण अधिकार | |
| | | आयुक्त | रू. २५.०० लक्ष पर्यंत | |

| | | | |
|---|---|---|---|
| २:- त्याचप्रमाणे प्राप्त निविदा निविदेमधील नमुद राशीपेक्षा जास्त असल्यास मुख्य अभियंता यांची अनुमती घेणे बंधनकारक राहील. | अपर आयुक्त | रू. १०.०० लक्ष (रुपये दहा लक्ष फक्त) पर्यंत | |
| ३:- एखाद्या विभागाकरीता अपर आयुक्त नसल्यास त्यांचे अधिकार मुख्य अभियंता यांना राहतील. | सहा. आयुक्त/कार्यकारी अभियंता | | रू. ५.०० लक्ष (रूपये पन्नास लक्ष फक्त) पर्यंत (क्षेत्रीय अंदाजपत्रकातील पदांकरीता) |
| **४) कार्यादेश निर्गमीत करणे व करारनामा करणे.** | | | |
| १ :- अनु क्र. ३ मध्ये नमुद आवश्यक मंजुरी /ठराव कार्यान्वीत झाल्यानंतर उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत.<br>२ :- कार्यादेश निर्गमीत करण्याआधी संवीदा (करारनामा) करणे बंधनकारक आहे. संविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७४ नुसार विहित केलेल्या पध्दतीनुसारच करण्यात यावी. कार्यादेशाची प्रत विभाग प्रमुखाला पाठविणे बंधनकारक राहील व विभाग प्रमुखाने त्याची नोंद ठेवावी.<br>३ :- कार्यादेशाची व संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार स्थायी समितीस सादर करणे. संविदा करणारे प्राधिकृत अधिकारी यांना बंधनकारक राहील. | कार्यकारी अभियंता / इतर विभागाचे विभाग प्रमुख | पुर्ण अधिकार | |
| **५) अतिरीक्त बाबींना कार्यादेशाच्या मर्यादित राशी पर्यंत मंजुरी प्रदान करणे** | | | |
| प्राकलनीय राशीच्या कामामध्ये उद्भवनाऱ्या अतिरीक्त बाबींना कार्यादेशाच्या मर्यादित राशी पर्यंत मंजुरी प्रदान करणे. | मुख्य अभियंता | रू. १०.०० (रूपये दहा लक्ष फक्त) लक्षापेक्षा अधिक | |
| | अधिक्षक अभियंता | रू. १०.०० (रूपये दहा लक्ष फक्त) लक्षा पर्यंत | |

| | | | |
|---|---|---|---|
| | कार्यकारी अभियंता | निविदा/आवेदन राशीचे १०% टक्के मर्यादित वा जास्तीत जास्त रू. १.०० (रूपये एक लक्ष फक्त) पर्यंत | |
| **६) कंत्राटदारास मुदतवाढ देणे** | | | |
| मुदतवाढ एका प्रकरणी एकाचवेळेस देता येईल. तदनंतर मुदतवाढ आवश्यक असल्यास आयुक्त यांची पुर्वानुमती घेणे आवश्यक राहील. | मुख्य अभियंता | कामाचा मुळ कालावधी पेक्षा ३० दिवस अधिक पर्यंतची मुदतवाढ | |
| **७) कंत्राटदारास मुदतवाढ देण्याचा आदेश निर्गमीत करणे** | | | |
| १ :- प्रत्येक प्रकरणी सक्षम अधिकारी यांची मान्यता घेणे बंधनकारक आहे. तसेच मुदतवाढ देण्याचे आदेशाची प्रत विभाग प्रमुखास सादर करणे बंधनकारक आहे.<br>२ :- कंत्राटदाराने दिलेल्या मुदतीमध्ये काम पुर्ण केले असल्यास अंतिम देयक १५ दिवसात सादर करणे बंधनकारक आहे. | कार्यकारी अभियंता | पुर्ण अधिकार | |
| **७) कंत्राटदाराला दंड/नुकसान भरपाई आकारणे** | | | |
| निविदा अटी व शर्ती नुसार | आयुक्त | रू. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) चे वरील कामाकरीता | |
| | मुख्य अभियंता | | रू. २५.०० लक्ष (रूपये पंचवीस लक्ष फक्त) पर्यंत |
| | अधिक्षक अभियंता | | रू. १०.०० लक्ष (रूपये दहा लक्ष फक्त) पर्यंत |
| | कार्यकारी अभियंता | | रू. ५.०० लक्ष (रूपये पाच लक्ष फक्त) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| | **८) दंड कमी जास्त करणे / परत करणे व माफ करणे** | | |
| | कार्यकारी अभियंता परिपुर्ण प्रस्ताव प्रशासकीय पध्दतीने आयुक्तास सादर करतील. | आयुक्त | पुर्ण अधिकार |

**( हेमंत ठाकरे )**
**प्रमुख लेखा व वित्त अधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**